# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, (महाराष्ट्र शासन)
# समाज कल्याण कार्यालय, बीड.
# आणि गुरुकिल्ली अॅकॅडमी, बीड यांचे संयुक्तविद्यमाने

## राज्यस्तरिय सामान्यज्ञान परीक्षा-2017

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, (महाराष्ट्र शासन) समाज कल्याण कार्यालय, बीड आणि गुरुकिल्ली अॅकॅडमी, बीडच्या माध्यमातुन राज्यस्तरिय **"सामान्यज्ञान परीक्षा 2017"** चे आयोजन करण्यात आले आहे. यात एकुण 5 लक्ष + रुपयापेक्षा अधिक बक्षीसाचा समावेश करण्यात आले आहे. **(बक्षिसाचं विवरण खालील प्रमाणे आहे.)**

**प्रथम बक्षिस**
**रु. 1,00,000/-**

**द्वितीय बक्षिस**
**रु. 51,000/-**

**तृतीय बक्षिस**
**रु. 21,000/-**

### 1. उत्तेजनार्थ बक्षिसे

- 100 विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु .1,000/-ची बक्षिसे
- 200 विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु .500/-ची बक्षिसे
- 1000 विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु .100/-ची बक्षिसे
- 2000 विद्यार्थ्यांना चालु घडामोडी पुस्तक बक्षिस.

### 2. या व्यतिरिक्त सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यांना

A. सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यांना रु. 250/- किंमतीचे 10,000 ऑनलाईन प्रश्न (100 प्रश्नपत्रिकासंच) देण्यात येईल.

B. प्रत्येक इच्छुक विद्यार्थ्यांना 5 महिने कालावधीचे मोफत MPSC (पुर्व + मुख्य) प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**C. या परीक्षेच्या माध्यमातुन गुणवत्तेनुसार राज्यातील पाच आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मुले एका वर्षासाठी दत्तक घेण्यात येणार आहेत**

**D. तसेच स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रतिमाह 300/- रुपयाची शिष्यवृती 5 महिन्या करिता देण्यात येईल.**

https://maharecruitment.mahaonline.gov.in/MR/MahaRecruitmentMainPage.aspx

# राज्यस्तरिय सामान्यज्ञान परीक्षा संदर्भात नियम :-

1. https://maharecruitment.mahaonline.gov.in/MR/MahaRecruitmentMainPage.aspx उमेदवाराने यासंकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.
2. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.
3. सदरील परीक्षा ही 100 प्रश्नांची व 100 गुणांसाठी असून यासाठी वेळ 1 तास राहिल.
4. परीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यास वेग-वेगळी प्रश्नपत्रिका देण्यात येईल.
5. यासाठी किमान वयोमर्यादा 15 वर्ष असून किमान शैक्षणिक पात्रता 9 वी पास राहिल.
6. **परीक्षेसाठी मराठी भाषा, इंग्रजी भाषा, गणित, बुध्दीमत्ता चाचणी, भूगोल, इतिहास, विज्ञान, अर्थशास्त्र, चालूघडामोडी, राज्यघटना या विषयांचा समावेश असेल.**
7. विद्यार्थीसंख्या जास्त असल्यास बैठक व्यवस्थेच्या दृष्टीने एकापेक्षा जास्त टप्प्यात परीक्षा घेण्याचा अधिकार हा राखुन ठेवण्यात आला आहे.
8. प्रवेशपत्रासाठी नियोजित दिनांक प्रत्येक विद्यार्थ्यांस एसएमएस द्वारे कळविण्यात येईल.
9. परीक्षेच्या दिवशी प्रश्नपत्रिका प्रत्येक विद्यार्थ्यास देण्यात येतील, परंतु उत्तरपत्रिका गुण पडताळणीसाठी जमा करण्यात येईल.
10. परीक्षा संदर्भात कोणत्याही अधिकारी, संचालक, कर्मचारी यांच्या नातेवाईकास या परीक्षेमध्ये सहभाग नोंदविता येणार नाही.
11. सदरील परीक्षेचे पूर्ण उत्तरतालिका या OMR पध्दतीने तपासल्या जातील.
12. परीक्षेची उत्तर तालिका परीक्षा झाल्यावर www.gurukilli.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
13. परीक्षा ही शक्यतो राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी होईल; परंतु जिल्ह्यातील उपलब्ध महाविद्यालयातील उपलब्ध आसन क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी/जास्त अर्ज आल्यास उर्वरित विद्यार्थ्यांची परीक्षा ही बीड जिल्हयाच्या ठिकाणी घेण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे. **(यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम अर्ज करणा-या विद्यार्थ्यांस प्राधान्य देण्यात येईल.)**
14. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम हा बीड मुख्यालयाच्या ठिकाणी मान्यवरांच्या यांच्या हस्ते होईल.
15. बक्षिस वितरणासाठीची नियोजित दिनांक प्रत्येक विद्यार्थ्यांस ई-मेल, एसएमएस द्वारे कळविण्यात येईल.
16. आवश्यकता भासल्यास / गरज असल्यास सदरील दिलेल्या परीक्षेच्या नियोजित वेळेमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार तसेच परीक्षेसंदर्भात सर्व अधिकार हे संचालक, गुरुकिल्ली ॲकॅडमी, बीड यांनाच असेल.
17. परीक्षेसाठी परीक्षा शुल्क रु.200 असून तसेच इतर खार्चापोटी 25 रुपये फिस आकारण्यात येईल. सदरील फिस ही ना परतावा राहिल किंवा एकदा भरलेला अर्ज कोणत्याही परिस्थितीमध्ये रद्द करण्यात येणार नाही.
18. एखाद्या विद्यार्थी परीक्षेत गैरप्रकार करतांना आढळल्यास त्यास तात्काळ वर्गाबाहेर काढून सदरील विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द करण्यात येईल.
19. एखाद्या विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंद असल्यास किंवा गुन्हा नोंद होईल असे वर्तन आढळल्यास कोणत्याही क्षणी त्याचा अर्ज अपात्र करण्यात येईल तसेच कोणतेही बक्षिस देण्यात येणार नाही.
20. समान गुण मिळाल्यास विद्यार्थ्यांची निवड ही वय, शैक्षणिक गुणवत्ता यावर करण्यात येईल, तसेच विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज मध्ये नमुद केलेले प्रमाणपत्राची पडताळणी करुनच बक्षिस वितरण केले जाईल. यात समितीचा निर्णय अंतिम राहिल.
21. किंवा समान गुण मिळविणा-या विद्यार्थ्यांची / गुणवंत विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय राखुन ठेवण्यात आला आहे.
22. अर्ज भरतांना दिलेली माहिती चुकीची आढळल्यास अथवा दिशाभूल करणारी असल्यास कोणत्याही क्षणी उमेदवारांचा सदरील परीक्षेसाठी कायमचा अर्ज अपात्र करण्यात येईल.
23. **या परीक्षेसंदर्भात काही वाद उद्भवल्यास तो वाद पाच सदस्यीय समितीच्या मार्फत सोडविण्यात येईल, समितीचा निर्णय हा अंतिम राहिल यात कोणत्या परीक्षार्थीला/ उमेदवाराला न्यायालयात दाद मागता येणार नाही.**

*****

https://maharecruitment.mahaonline.gov.in/MR/MahaRecruitmentMainPage.aspx

# मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व शिष्यवृत्ती योजना संदर्भात नियम

1) मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व शिष्यवृत्ती योजना ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, (महाराष्ट्र शासन) समाजकल्याण कार्यालय, बीड आणि गुरुकिल्ली ॲकॅडमी, बीडच्या मार्फत राबविण्यात येत आहे.
2) सदरील प्रशिक्षण कालावधी हा 5 महिन्याचा राहिल.
3) या कालावधी दरम्यान प्रत्येक इच्छुक विद्यार्थ्यांस सोमवार ते शुक्रवार प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रत्येक शनिवारी सदरील विद्यार्थ्यांची प्रशिक्षण अंतर्गत सराव परीक्षा घेण्यात येणार आहे तसेच प्रत्येक रविवार रोजी सुट्टी देण्यात येईल.
4) प्रशिक्षणासाठी विद्यार्थी किमान 9 वी पास असावा.
5) सदरील प्रशिक्षण हे प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी तसेच संबंधित जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी देण्यात येईल
6) सदरील प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांस नियमाप्रमाणे गुरुकिल्ली ॲकॅडमी, मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र (प्रत्येक जिल्ह्यातील) येथे प्रवेश निश्चित करावा लागेल.
7) प्रवेशासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना विहित नमुन्यातील अर्जासह 1) आधार कार्ड 2) पासपोर्ट आकाराचे तीन फोटो 3) शिष्यवृत्तीसाठी BOI बँकेचे खाते क्रमांक पासबुक झेरॉक्स 4) काही अनामत रक्कम जमा करावी लागेल. **(सदरील रक्कम ही परतावा राहिल.)** **(मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी अनामत रक्कम विद्यार्थ्यांकडून घेणे याचा मुळ उद्देश हा विद्यार्थ्याने स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण नियमित पूर्ण करावे हा आहे. परंतु सदरील अनामत रक्कम प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळी आकारण्यात येईल.)**
8) विद्यार्थ्यांने प्रशिक्षण घेण्यापूर्वी संस्थेकडे जमा केलेली अनामत रक्कम ही प्रत्येक विद्यार्थ्यांस बॅच कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल परंतु यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
9) लेखी परीक्षा ही 100 गुणांची व 100 प्रश्नाची असून यासाठी 1 तास वेळ देण्यात येईल.
10) लेखी परीक्षेत किमान 60 टक्के गुण मिळविणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांस सदरील रक्कम ही गुरुकिल्ली ॲकॅडमीच्या माध्यमातुन परत करण्यात येईल.
11) **तसेच लेखी परीक्षेत 60 पेक्षा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांस परीक्षा पास होण्यासाठी या व्यतिरीक्त एक संधी पुन्हा देण्यात येईल, पुन्हा संधी देऊनही विद्यार्थ्यास कमी गुण मिळाल्यास कोणतीही रक्कम विद्यार्थ्यांस परत करण्यात येणार नाही.**
12) प्रशिक्षण कालावधी दरम्यान प्रत्येक विद्यार्थ्यांस 300 रु. प्रति माह शिष्यवृत्ती देण्यात येईल.
13) सदरील शिष्यवृत्ती राष्ट्रीयकृत BOI बँकच्या खात्यावर प्रत्येक महिन्यास जमा करण्यात येईल. **(विद्यार्थ्यांने सदरील शिष्यवृत्तीचा उपयोग स्पर्धा परीक्षासाठी उपयुक्त साहित्य / पुस्तके खरेदी करावा हा आहे.)**
14) प्रशिक्षण कालावधी दरम्यान विद्यार्थ्यास राज्यसेवा पूर्व, मुख्य आणि मुलाखत याचे प्रशिक्षण देण्यात येईल.
15) **यात प्रामुख्याने गणित, बुध्दीमत्ता चाचणी, मराठी भाषा, इंग्रजी भाषा, इतिहास, समाजसुधारक, भूगोल, राज्यघटना, ग्रामप्रशासन, भूगोल, कृषी, अर्थशास्त्र, माहितीचा अधिकार अधिनियम – 2005 या विषयाचा समावेश असेल.**
16) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी वेळ ठरविण्याचा संपूर्ण अधिकार हा केंद्रसंचालक, गुरुकिल्ली ॲकॅडमी यांना राहिल.
17) मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी प्रवेश झाल्यानंतर मध्येच कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येणार नाही किंवा सदरील विद्यार्थ्याने भरलेली पूर्ण अनामत रक्कम परत मिळणार नाही.
18) एखाद्या विद्यार्थ्यांवर गुन्हा नोंद झालेला असल्यास किंवा गुन्हा नोंद होईल असे वर्तन असल्यास त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार संचालक, गुरुकिल्ली ॲकॅडमी, बीड यांनी राखून ठेवला आहे.
19) **या मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण संदर्भात काही वाद उद्भवल्यास सदरील वाद हा मा. तक्रार व निवारण समिती मार्फत निकाली काढण्यात येईल व तक्रार व निवारण समितीचा निर्णय हा अंतिम असेल त्या बाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.**

******

**मोफत नौकरी विषयक माहिती आपल्या ग्रुप वर मिळविण्यासाठी 9422060303 हा क्रमांक आपल्या Whatapp Group वर Add करा.**

**www.mhjob.in**

https://maharecruitment.mahaonline.gov.in/MR/MahaRecruitmentMainPage.aspx